दै. सकाळ दि. 21/06/25

सकाळ

# नांदेडमध्ये सराईत गुन्हेगाराची धिंड

## अनेक गुन्हे नोंद, पोलिसांवरही रोखले होते पिस्तूल



**नांदेड :** सराईत गुन्हेगार प्रभाकर हंबर्डे याची शुक्रवारी पोलिसांनी काढलेली धिंड

**नांदेड, ता. २० :** शहरातील विष्णुपुरी परिसरात अनेक वर्षांपासून दहशत निर्माण करणारा सराईत गुन्हेगार प्रभाकर हंबर्डेची शुक्रवारी (ता. २०) नांदेड ग्रामीण पोलिसांनी रस्त्यावरून धिंड काढली. हंबर्डे याच्यावर जबरी चोरी, खंडणी, मारहाण, दरोडा, हप्ता वसुली आदी दहापेक्षा अधिक गंभीर गुन्हे दाखल आहेत. काही महिन्यांपूर्वी त्याच्यावर 'मोक्का'अंतर्गत कारवाई झाली होती.

जामिनावर सुटलेल्या हंबर्डेने पुन्हा एकदा एका नागरिकावर गंभीर हल्ला करून पळ काढला होता. त्याच्या अटकेसाठी गेलेल्या पोलिसांवर त्याने गावठी पिस्तूल रोखले होते. स्वसंरक्षणार्थ ग्रामीण पोलिस ठाण्याचे निरीक्षक चिंचोलकर यांनी स्वतःच्या पिस्तुलातून गोळी झाडून त्याला प्रत्युत्तर दिले होते. त्यात हंबर्डे जखमी झाला. त्यानंतर त्याला ताब्यात घेऊन वैद्यकीय उपचारांनंतर अटक करण्यात आली. हंबर्डेच्या अटकेनंतर नांदेड ग्रामीण पोलिसांनी त्याची विष्णुपुरी परिसरात धिंड काढली. विशेष म्हणजे, या धिंडीदरम्यान पोलिस वाहनातील स्पीकरवरून परिसरातील नागरिकांना आवाहन केले जात होते, "या आरोपीविरुद्ध तक्रार करायची असल्यास पोलिस ठाण्याला भेट द्यावी. गरज भासल्यास तुमचे नाव गोपनीय ठेवले जाईल. केवळ हंबर्डेच नव्हे; तर कुणीही गुन्हेगार सामान्य नागरिकांना त्रास देत असल्यास पोलिसांशी संपर्क साधावा," असा या आवाहनाचा आशय होता.

> “ कुणी सामान्य नागरिकांना त्रास देत असेल, गुंडगिरी करत असेल तर ११२ या क्रमांकावर किंवा पोलिस ठाण्याच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधून किंवा पोलिस ठाण्यात येऊन माहिती द्यावी. कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही. कितीही मोठा आरोपी असला तरी त्याच्यावर कायद्याप्रमाणे कारवाई होईल.
>
> **- ओमकांत चिंचोळकर,** पोलिस निरीक्षक, नांदेड ग्रामीण पोलिस ठाणे